पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांना “मुंबई पोलीस फाऊन्डेशन” नामक न्यास स्थापन करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-०९१७/प्र.क्र.४६५/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक २३ ऑक्टोबर २०१७.

वाचा :- पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांचे पत्र क्रमांक ५१६/पोआ/सहपोआ/का.व-सु./२०१७, दिनांक २९.०८.२०१७.

प्रस्तावना.-

मुंबई शहरातील अनेक खाजगी संस्था व उद्योग समूह “Corporate Social Responsibility” म्हणून बृहन्मुंबई पोलीस यांचे आधुनिकीकरण व कल्याण यांसाठी देणगी देण्यासाठी तयार असतात. त्याकरिता जगातील इतर देशांमधील महानगर पोलीस दलांप्रमाणेच बृहन्मुंबई पोलीस यांच्याकरिता “मुंबई पोलीस फाऊन्डेशन” नामक नोंदणीकृत न्यास स्थापन करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांनी पत्र क्रमांक ५१६/पोआ/सहपोआ/का.व-सु./२०१७, दिनांक २९.०८.२०१७, द्वारे शासनाकडे केली आहे. त्या अनुसार शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय.-

बृहन्मुंबई पोलीस यांचे आधुनिकीकरण व कल्याण यांसाठी खाजगी संस्था व उद्योग समूह यांच्याकडून स्वेच्छापूर्वक देणगी स्वीकारण्यास व अशा रीतीने प्राप्त निधीचा वापर करणे या प्रयोजनांसाठी, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांना “मुंबई पोलीस फाऊन्डेशन” नामक न्यास स्थापन करण्यास, पुढील अटींवर, याद्वारे मान्यता देण्यात येत आहे:-

अटी.-

१) There shall be no conflict of interest or perception thereof while collecting donations.

२) Donations shall be accepted only from persons/ bodies with high credibility.

३) Donations shall not be accepted from persons/ bodies likely to compromise the functions, duties or responsibilities of the Police force.

४) The draft of the trust deed and other incidental matters shall be examined by the Law and Judiciary Department before an application is made to the office of the Charity Commissioner, Maharashtra State, for registration of the said trust.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०२३१७५४४०४४२९ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2017.10.23 17:43:53 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (गृह-शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), वित्त व नियोजन, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई.
८) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई.
९) धर्मदाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
११) निवड फाईल, पोल-७.